प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# वाघ अभियांत्रिकीच्या ५४ विद्यार्थ्यांना रोजगार

## यंत्र विभागाच्या विद्यार्थ्यांचा समावेश; सर्वाधिक ११.२० लाखांचे पॅकेज

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ५४ विद्यार्थ्यांना विविध उद्योगसमूहांत रोजगार मिळाला आहे.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट सेलमार्फत शैक्षणिक वर्ष २०२३- २४ मधील मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सुमारे २० नामांकित मल्टिनॅशनल उद्योगसमूहांनी सहभाग घेतला होता. त्यात ५४ विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळाली असून, त्यांना सरासरी ५.१६, तर सर्वाधिक ११.२० लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज प्राप्त झाले आहे. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, डॉ. एस. एस. साने, डॉ. प्रीती भामरे, डॉ. पी. बी. कुशारे, ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्रा. भूषण पाटील व प्रा. पी. बी. सुरवाडे यांनी कामकाज पाहिले.



**नाशिक : येथील के. के. वाघ महाविद्यालयात कॅम्पस मुलाखतीत निवड झालेले विद्यार्थी. समवेत मान्यवर.**

### मेकॅनिकलच्या विद्यार्थ्यांना सर्वाधिक पॅकेज

मेकॅनिकलच्या विद्यार्थ्यांनी ई- बाजा आणि इलेक्ट्रिकल व्हेईकल डिझाइन अ‍ॅण्ड मॅन्युफॅक्चरिंग प्रोजेक्ट तयार करत हैदराबाद येथील एस.ए.ई. इंडियाने आयोजित स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यामुळे वेदांत देशपांडे व तुषार भावसार या विद्यार्थ्यांना नामांकित कंपनीने सर्वाधिक ११.२० लाखांचे पॅकेजने दिले, अशी माहिती मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ. पी. बी. कुशारे यांनी दिली.



# के. के. वाघ अभियांत्रिकीच्या ५४ विद्यार्थ्यांना नोकरी

## मेकॅनिकल विभागाच्या विद्यार्थ्यांचा समावेश; सर्वाधिक ११.२० लाखांचे पॅकेज

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलमार्फत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुमारे २० नामांकित मल्टिनॅशनल उद्योगसमूहांनी सहभाग घेतला. यात ५४ विद्यार्थ्यांची नोकरीची सुवर्णसंधी मिळालेली आहे.

५४ विद्यार्थ्यांपैकी १२ मुली व ४२ मुले आहेत. नोकरी मिळालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी ५.१६ लाख तर सर्वाधिक ११.२० लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज प्राप्त झालेले आहेत. या उद्योगसमूहांमध्ये आयटी इंडस्ट्रीज, कोअर इंडस्ट्रीज आणि सर्व्हिस इंडस्ट्रीजचा समावेश होता.

मेकॅनिकलच्या विद्यार्थ्यांनी ई-बाजा आणि इलेक्ट्रिकल व्हेईकल डिझाइन अँड मॅन्युफॅक्चरिंग प्रोजेक्ट तयार करत हैद्राबाद येथील एस.ए.ई. इंडियाने आयोजित स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यामुळे त्यांच्या वेदांत देशपांडे व तुषार भावसार या विद्यार्थ्यांचे सिलेक्शन टाटा या नामांकित कंपनीने सर्वाधिक ११.२० लाखांचे पॅकेज मिळाले, अशी माहिती मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ. पी. बी. कुशारे यांनी दिली.

या सर्व कंपन्यांच्या मुलाखतींमध्ये प्रथमतः ऑनलाइन टेस्ट त्यानंतर टेक्निकल टेस्ट, वैयक्तिक मुलाखतीची फेरी घेण्यात आली. हे सर्व निकष पार केल्यानंतर विद्यार्थ्यांची निवड केली जाते. विद्यार्थ्यांमधील सुप्तगुण विकसित होऊन एक समाजाभिमुख अभियंता निर्माण व्हावा यासाठी महाविद्यालय तत्परतेने कार्य करत असते. तसेच के. के. वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना भविष्यातदेखील इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून दिली जात असल्याची माहिती प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी दिली.

या शैक्षणिक वर्षात नामांकित उद्योगसमूहांनी महाविद्यालयात येऊन कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन केले होते. त्यांपैकी काही कंपन्यांचे निकाल येणे बाकी आहेत. तसेच आगामी काळात कंपन्यांचे कॅम्पस ड्राइव्ह नियोजित असल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली.

संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर, विभागप्रमुख डॉ. एस. एस. माने, डॉ. प्रीती भामरे, डॉ. पी. बी. कुशारे आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच प्रा. भूषण पाटील व प्रा. पी. बी. सुरवाडे यांनी कामकाज केले.

# के. के. वाघ अभियांत्रिकीतर्फे उन्हाळी तंत्रज्ञान शिबिर

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २१ : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ए.आय.सी.टी आयडा लॅबकडून नुकतेच पंधरा दिवसाचे शालेय मुलांसाठी टेक्नॉलॉजी समर कॅम्प अर्थात उन्हाळी तंत्रज्ञान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात इयत्ता पाचवी ते नववीच्या ४२ मुला व मुलींनी सक्रिय सहभाग नोंदवला.

२१ व्या शतकात मुलांना आवश्यक कौशल्ये प्रदान करणे गरजेचे आहे. ती कौशल्ये प्रदान करण्यासाठी मुलांना लहान वयातच त्या कौशल्यांची तोंड ओळख असणे महत्त्वाचे आहे. मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी के के वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून यंदाच्या उन्हाळी सुट्टीत तंत्रज्ञान शिबिराचे आयोजन करण्यामागचा मुख्य हेतू होता. या दरम्यान मुलांना अभियांत्रिकी महाविद्यालयातील अत्याधुनिक मशिन्स व आधुनिक प्रणाली, प्रोजेक्ट मॉडेल, मैदानी खेळ, तंत्रज्ञान विषयक माहिती आदींचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच समस्या सोडविण्याच्या क्षमतेला चालना देणे, सर्जनशीलतेचे धडे गिरवणे, संवाद कौशल्य याबाबत मार्गदर्शन केले.

शिबिर समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर व विभाग प्रमुख डॉ. एस. एस. साने यांनी मुलांना मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, आयडा लॅबचे समन्वयक डॉ. रवींद्र मुंजे यांनी शिबिरात सहभागी मुलांचे अभिनंदन करत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# उत्कृष्ट प्रकल्पांपैकी सहा प्रकल्पांना पारितोषिक

## के. के. वाघ अभियांत्रिकीतर्फे प्रकल्प स्पर्धा उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १८ : के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून येथील विज्ञान विभाग व एआयसीटीई आयडिया लॅब यांच्या वतीने प्रकल्प प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत ३४ उत्कृष्ट प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. स्पर्धेत क्रेजी एक्सप्लॉर्स स्मार्ट स्टेयर क्लीनर, कृषी : एन इनसाइटफुल फार्मिंग, स्त्री अस्त्र, इन्वेस्टमेंट अॅडवाइजर चॅटबोट, ऑटोमॅटिक फायर ब्रिगेड ट्रक, एल २-३ अॅडप्टिव मॅट्रिक्स हेडलाइट अशा ६ उत्कृष्ट प्रकल्पांना पारितोषिक देण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक आणि तांत्रिक सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे, हा प्रकल्प प्रदर्शनाचा मुख्य उद्देश होता. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, डॉ. शांतम शुक्ला, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, स्नेहल बोंडे, व्यंकी कटारिया स्पर्धेचे उद्घाटनास उपस्थित होते.

याप्रसंगी समीर वाघ यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्य वाढविण्याच्या दृष्टीने तर्कबुद्धी आणि तंत्रज्ञान याबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. नांदुरकर यांनी संस्थेच्या राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांबद्दल माहिती दिली.

प्रथम वर्ष बीटेक विद्यार्थ्यांनी 'इंजिनिअरिंग एक्सप्लोरेशन' या विषयांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध शाखेतले १०० प्रकल्प तयार केले. प्रामुख्याने संगणक, माहिती तंत्रज्ञान, यांत्रिकी, विद्युत व विद्युत क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रमानव यांच्या प्रगतीच्या कल्पनांचा मूलभूत संदर्भ विचारात घेऊन विद्यार्थ्यांनी अनेक उत्कंठावर्धक, प्रेरणादायी व आव्हानात्मक असे प्रकल्प तयार केले.

मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण पार पडले. डॉ. एम. एन. शेलार, प्रा. पूनम फेगडे, डॉ. ज्ञानेश्वरी पाटील, प्रा. ए. एल. मौर्य यांनी परीक्षक म्हणून कामकाज केले. अधिष्ठाता डॉ. एस. एस. साने, डॉ. डी. एस. चांदवडकर, डॉ. पी. डी. भामरे, डॉ. आर. के. मुंजे, डॉ. सुनील कुटे यांचे उपक्रमासाठी मार्गदर्शन लाभले. डॉ. विलास पाटील, डॉ. अनुराधा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. ए. डब्ल्यू. एम. एच. अन्सारी व प्रा. मोनाली क्षीरसागर यांनी कामकाज केले. प्रा. शीतल सोनवणे व प्रा. मोहिनी आहेर यांनी सूत्रसंचालन केले.

# वाघ अभियांत्रिकीच्या ४६ विद्यार्थ्यांना नोकरी



■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २ : के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट सेलमार्फत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील इलेक्ट्रॉनिक अँन्ड टेलिकम्युनिकेशन (ई अँन्ड टीसी) विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन केले होते. यात विविध नामांकित उद्योगसमूहांनी सहभाग घेतला. यात ४६ विद्यार्थ्यांची प्लेसमेंटमध्ये निवड केली.

४६ विद्यार्थ्यांपैकी २७ मुली व १९ मुले आहेत. नोकरी मिळालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी ४.५० लाख, तर सर्वाधिक सहा लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज मिळालेले आहे. विविध नामांकित उद्योग समूहांमध्ये आयटी इंडस्ट्रीज, कोअर इंडस्ट्रीज आणि सर्व्हिस इंडस्ट्रीजचा समावेश होय. या सर्व कंपनीच्या मुलाखतींमध्ये प्रथमतः ऑनलाइन टेस्ट त्यानंतर टेक्निकल टेस्ट, वैयक्तिक मुलाखतीची फेरी झाली. हे सर्व निकष पार केल्यानंतर विद्यार्थ्यांची निवड केले जाते. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण विकसित होऊन एक समाजाभिमुख अभियंता निर्माण व्हावा, यासाठी महाविद्यालय तत्परतेने कार्य करत आहे. तसेच के. के. वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना परदेशातही इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून दिली जाते, असे मत प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी व्यक्त केला.

या शैक्षणिक वर्षात विविध नामांकित उद्योग समूहाची महाविद्यालयात कॅम्पस ड्राईव्हसाठी भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. अद्याप काही कंपन्यांचे निकाल येणे बाकी आहेत.

तसेच, आगामी काळात कंपन्यांचे कॅम्पस ड्राईव्ह नियोजित असल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी के शहाबादकर यांनी दिली. के. के. वाघ संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अशोक मर्चंट, विश्वस्त चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, विश्वस्त व विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, विश्वस्त शकुंतला वाघ, विश्वस्त डॉ. प्रीती भामरे, विश्वस्त व विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. माने, विभागप्रमुख डॉ. डी. एम. चांदवडकर आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विभागाचे समन्वयक प्रा. निखिल भुजबळ व प्रा. पराग मोंढे यांनी कामकाज केले.

# के. के. वाघ अभियांत्रिकीतील ४६ विद्यार्थ्यांना रोजगार

## • इलेक्ट्रॉनिक अ‍ॅण्ड टेलीकम्युनिकेशन विभागाच्या विद्यार्थ्यांचा समावेश

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट सेल मार्फत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील इलेक्ट्रॉनिक अ‍ॅण्ड टेलीकम्युनिकेशन (ई अ‍ॅण्ड टीसी) विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते. यात ४६ विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

नोकरी मिळालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी ४.५० लाख तर सर्वाधिक ६ लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज मिळाले आहे. विविध नामांकित उद्योगसमूहांमध्ये आयटी इंडस्ट्रिज, कोअर इंडस्ट्रिज आणि सर्व्हिस इंडस्ट्रिजचा समावेश आहे. नोकरी प्राप्त झालेल्यांमध्ये २७ विद्यार्थिनी, तर १९ विद्यार्थी आहेत.

कंपनीच्या मुलाखतीमध्ये प्रथमतः ऑनलाइन टेस्ट त्यानंतर टेक्निकल टेस्ट, वैयक्तिक मुलाखतीची फेरी घेण्यात आली. सर्व निकष पार केल्यानंतर विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. चालू शैक्षणिक वर्षात विविध नामांकित उद्योग समूहांची महाविद्यालयात कॅम्पस ड्राइव्हसाठी भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. काही कंपन्यांचे निकाल येणे बाकी आहेत. आगामी काळात कंपन्यांचे कॅम्पस ड्राइव्ह नियोजित असल्याची माहिती ट्रेनिग अ‍ॅण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, विभागप्रमुख डॉ. एस. एस. साने, शकुंतलाताई वाघ, डॉ. प्रीती भामरे, विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. माने, विभागप्रमुख डॉ. डी. एम. चांदवडकर आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ई अ‍ॅण्ड टीसी विभागाचे समन्वयक प्रा. निखिल भुजबळ व प्रा. पराग मोंढे यांनी कामकाज पाहिले.



**नाशिक : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट सेलमार्फत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील इलेक्ट्रॉनिक अ‍ॅण्ड टेलीकम्युनिकेशन (ई अ‍ॅण्ड टीसी) विभागातील रोजगार मिळालेले विद्यार्थी.**

गांवकरी
www.gavakari.net
30 Apr 2024 - 3



# वाघ अभियांत्रिकीच्या ४६ विद्यार्थ्यांना नोकरी

**नाशिक :**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल मार्फत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील इलेक्ट्रॉनिक अॅण्ड टेलीकम्युनिकेशन (ई अँड टीसी) विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये विविध नामांकित उद्योगसमूहांनी सहभाग घेतला. यांत ४६ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट मध्ये निवड करण्यात आली.

४६ विद्यार्थ्यांपैकी २७ मुली व १९ मुले आहेत. नोकरी मिळालेल्या विद्यार्थ्यांना सरासरी ४. ५० लाख तर सर्वाधिक ६ लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज मिळालेले आहे. विविध नामांकित उद्योगसमूहांमध्ये आयटी इंडस्ट्रीज, कोअर इंडस्ट्रीज आणि सर्व्हिस इंडस्ट्रीजचा समावेश होय.

या सर्व कंपनीच्या मुलाखतीमध्ये प्रथमतः ऑनलाईन टेस्ट त्यानंतर टेक्निकल टेस्ट, वैयक्तिक मुलाखतीची फेरी घेण्यात आली. हे सर्व निकष पार केल्यानंतर विद्यार्थ्यांची निवड केल जाते. विद्यार्थ्यांना मधील सुप्त गुण विकसीत होऊन एक समाजभिमुख अभियंता निर्माण व्हावा यासाठी महाविद्यालय तत्परतेने कार्य करत आहे व तसेच के के वाघ अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना परदेशातदेखील इंटर्नशीपची संधी उपलब्ध करून दिली जाते. असे मत प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी व्यक्त केला. या शैक्षणिक वर्षात विविध नामांकित उद्योगसमूहांची महाविद्यालयात कॅम्पस ड्राईव्हसाठी भेटी देवून विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. अद्याप मात्र काही कंपन्यांचे निकाल येणे बाकी आहेत. तसेच आगामी काळात कंपन्यांचे कॅम्पस ड्राईव्ह नियोजित असल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली.

के के वाघ संस्थेचे अध्यक्ष मा. समीर वाघ, विश्वस्त मा. अशोक मर्चंट, विश्वस्त चांगदेवराव होळकर, विश्वस्त व प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर, विश्वस्त व विभागप्रमुख डॉ. एस एस साने, विश्वस्त शकुंतलाताई वाघ, विश्वस्त डॉ. प्रिती भामरे, विश्वस्त व विभाग प्रमुख मा. डॉ. व्ही एस माने, विभाग प्रमुख डॉ. डी. एम. चांदवडकर आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ई अँड टीसी विभागाचे समन्वयक प्रा. निखिल भुजबळ व प्रा. पराग मोंढे यांनी कामकाज केले.